## प्रस्तावना :

" उध्दवराव पाटील : विविधअंगी राजकीय नेतृत्व " हा विषय एम. फिल.च्या शोधनिबंधासाठी निवडला आहे. या विषयाची निवड करीत असताना कांही उद्देश समोर ठेवलेला होता. त्यादृष्टीने अभ्यासाची दिशा निश्चित केलेली होती.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात ज्या सामाजिक, राजकीय व आर्थिक चळवळी झाल्या त्या चळवळीत कार्य करणाऱ्या व दिशा देणाऱ्या नेत्यापैकी भाई उध्दवराव पाटील हे एक आहेत. त्यांच्या नेतृत्वासंबंधी सर्वांगिण स्वरूपाचा अभ्यास व्हावा हा प्रामाणिक हेतू हा विषय निश्चित करण्यामागे होता.

" उध्दवराव पाटील " यांच्या राजकीय विचारांचा व नेतृत्वाचा अभ्यास करीत असताना तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे क्रमप्राप्त बनते. स्वातंत्र्यपूर्व काळात निजामाच्या अधिपत्याखाली असलेल्या मराठवाडा विभागातील जनतेचे प्रश्न व त्यातून निर्माण झालेल्या चळवळी व राजकीय नेतृत्वाचा विकास या बाबींचा सांगोपांग अभ्यास या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नेतृत्वाचा विकास होत असताना त्या काळातील परिस्थितीचा परिणाम त्यावर कसा होतो याचा सैध्दांतिक पातळीवरून विचार करणे गरजेचे वाटते म्हणून यात यासंबंधी अभ्यास केलेला आहे.

उध्दवराव पाटील यांच्यावर प्रारंभीपासून झालेल्या चळवळीचा व सत्यशोधक, मार्क्सवादाचा प्रभाव कसा पडला व त्या अनुषंगाने त्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात कशा चळवळी उभ्या केल्या याचाही अभ्यास या निमित्ताने केलेला आहे. जनवादी चळवळी बरोबरच विधीमंडळाच्या पातळीवरही त्यांनी समाजातील शोषित वर्गाच्या बाजूने दिलेले लढे देखील अत्यंत महत्त्वाचे आहेत. नेतृत्व समजून घेण्यासाठी त्याचाही अभ्यास करणे गरजेचे वाटते. एखाद्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करीत असताना त्या कालखंडातील राजकीय विकासाची प्रक्रिया समजून घेता येवू शकते म्हणूनच हा विषय अभ्यासासाठी निश्चित करून सैध्दांतिकबाजूने संबंध राजकीय विकासाची प्रक्रिया समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

या शोध निबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक शोध पध्दतींचा वापर केलेला आहे. यात शासकीय कागदपत्रे, पक्षाचे प्रकाशित पत्रके व पुस्तिका, वृत्तपत्रे, नियतकालिके, संशोधन पत्रिका, शोध निबंध व ग्रंथालयातील पुस्तके यांचा मुख्यत्वे वापर करण्यात आलेला आहे. या साधनाबरोबरच उध्दवराव पाटील यांच्या सहवासातील सहकारी व्यक्तींच्या मुलाखती, भाषणांच्या ध्वनीमुद्रीत, विधिमंडळ कामकाजाचे अहवाल, शासकीय अहवाल, स्मरणिका यांचाही आधार घेण्यात आलेला आहे.

या शोध निबंधाचा अभ्यास करीत असताना शिवाजी

विद्यापिठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर , विधिमंडळ ग्रंथालय मुंबई, राजेरामराव महाविद्यालय ग्रंथालय जत, व एल.बी.एस, महाविद्यालय ग्रंथालय सातारा यांची खूपच मदत झाली. दै. मराठवाडा (औरंगाबाद), लोकमत व अजिंठा (औरंगाबाद), दै. महाराष्ट्र टाईम्स (मुंबई) या वृत्तपत्रांच्या संकलीत फाईल्स त्यांच्या ग्रंथालयात पाहण्यास मिळाल्या. या सर्व ग्रंथालयातील प्रमुख व कर्मचा-यांच्या सहकार्याबाबत मी त्यांचा ऋणी आहे. शोध निबंधाचे कार्य उध्दवराव पाटील हयात असताना पूर्ण करता आले असते तर ते अधिक दर्जेदार करता आले असते याची खंत मनाला सतत लागून राहिली. अर्थात साधनांची त्रूटी मुलाखतीने भरुन काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या शोध निबंधाचे काम करण्यास ज्यांची प्रेरणा व मार्गदर्शन सतत लाभले ते माझे मार्गदर्शक व राज्यशास्त्राचे अधिव्याख्याते डॉ. गोपाळ गुरु यांचे ऋण व्यक्त करण्यास शब्दच अपूरे वाटत आहेत. त्यांचे प्रेम व सहकार्य मी आयुष्यभर विसरु शकणार नाही.

राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. के. के. कावळेकर हे आम्हां सर्वांचे स्फूर्ती स्थान होय. सर्वांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचे ते सतत प्रयत्न करतात. प्रपाठक डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. सुरेंद्र जोंधळे, प्रा. वासंती रासम यांचेही मार्गदर्शन मिळाले. मी त्यांचाही आभारी आहे.

या शोध निबंधाचे काम मी त्वरीत पूर्ण करावे यामागे सतत प्रेरणा देणारे माझे वडीलबंधू श्रीधरराव पाटील, पितृतुल्य प्राचार्य वाळके व सौ. वाळके, मराठवाडा उच्चन्यायालयाच्या खंडपिठाचे न्यायाधिश बी. एन. उर्फ तात्यासाहेब देशमुख, माझे गुरू मोईन शाकीर व भावे, शिवाजीराव नलावडे, प्रा. मानसिंग जगताप, प्रा. देविदास पवार यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

या शोध निबंधाचे काम पूर्ण करण्यामध्ये ज्यानी फार महत्वाची मदत केली ते म्हणजे माझे मित्र प्रा. बा. ह. कल्याणकर, माझे स्नेही शिवाजीराव गंगणे, प्रा. सी. एस. पाटील, प्रा. एन. डी. कदम यांचा मी अत्यंत आभारी आहे.

या शोध निबंधासाठी ज्यांनी माझ्याशी प्रत्यक्ष चर्चा केली. मुलाखती दिल्या त्यामध्ये आमदार प्रा. एन. डी. पाटील, भाई भगवानराव सुर्यवंशी, आमदार भाई माणिकराव खापले, अँड. नरसिंगराव देशमुख, अँड. राजेंद्र देशमुख, श्री. मनोहरराव देशमुख, जयसिंगराव नलवडे, रघुनाथराव पाटील यांचाही मी आभारी आहे.

हा शोध निबंध पूर्ण करण्यासाठी मला जी संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा तसेच सेक्रेटरी, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, जत महाविद्यालयाचे माजी व आजी प्राचार्य भगवानराव बाबर व पोपटराव चव्हाण यांचे मी आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच रहाणे पसंत करतो.

या निबंधाचे काम मी लवकर पूर्ण करावे यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे माझे असंख्य मित्र, प्राचार्य उत्तमराव देशमुख, प्राचार्य ससे, उत्तमराव गायकवाड, नाना कळंत्रे, बाळासाहेब सावंत, डॉ. संजय वाळके, डॉ. मेघा वाळके, प्रा. मिसाळ, प्रा. ओमप्रकाश कलत्रे, प्रा. बी. जी. भोसले, प्रा. भगवानराव यादव, प्रा. जे. बी. पाटील, प्रा. अे. आर. पाटील, रामभाऊ पाटील, जयवंतराव वाळके, प्रा. एन. बी. देशमुख, प्रा. आहेर, ॲड. अनिल पाटील, ॲड. झाडके, प्रा. सी. जी. पाटील, प्रा. थोरात डी. एस., प्रा. काळे संपतराव, प्रा. चोपडे, प्रा. सी. आर. पाटील, प्रा. सासनूर, प्रा. नाईक, प्रा. जाधव व्हदअी, प्रा. चव्हाण, प्रा. राजेशिर्के, प्रा. रानडे, प्रा. कळंत्रे व जत महाविद्यालयातील सर्व वरिष्ठ, कनिष्ठ प्राध्यापक बंधू, शिक्षकेतर कर्मचारी, प्रा. शहाणे, प्रा. व्ही. डी. पाटील, प्रा. शामराव पाटील, प्रा. ठोके, प्रा. सुहास साळुंखे, प्रा. बाबराते, प्रा. बरकडे, श्री. तोरस्कर व हे काम करीत असताना ज्यांची थोडी गैरसोय झाली ते माझे विद्यार्थी मित्र या सर्वांचा मी आभारी आहे.

शोध निबंधाचे काम पूर्ण करण्यासाठी कोल्हापूर मुक्कामी मला ज्यांचे महत्वाचे सहकार्य लाभले ते माझे नातेवाईक अनंतराव वाळके, व त्यांच्या कुटुंबीयानी या कार्यासाठी जे वातावरण आवश्यक असते ते मला त्यांनी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

शेवटी जिची प्रेरणा व जिच्या सहकार्यामुळे मी हे कार्य

पूर्ण करू शकलो ती माझी पत्नी सौ. सरोज पाटील हिचाही ऋणी आहे. चि. सोनाली व चि. सुहास यांनीही काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे. शोध निबंधाचे काम अत्यंत तत्परतेने पूर्ण करून देण्याचे श्रेय श्री एच. एस. बिराजदार यांच्याकडे जाते त्यांचा व इतर त्यांनी या कामात सहकार्य केले त्या सर्व ज्ञात, अज्ञात मित्रांचा मी पुन्हा एकदा आभारी आहे.

धन्यवाद.

कोल्हापूर.

प्रा. शहाजी अ. पाटील

दिनांक : २९ नोव्हेंबर १९८८